**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १२/०३/२०२५ (बुधवार) सकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ११/०३/२५ रोजी रामटेक पोलीस, मनसर येथे वाहतूक केसेस करत असतांना टिप्पर क्र. एम. एच. ४९ बी. झेड. ९८९७ हे रामटेक कडून मनसरला येताणा दिसला असता त्यास हात दाखवून थांबवल्याचा इशारा करून वाहन थांबविले. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे कवडू घनश्याम मारबते वय ४१ वर्ष रा. वारेगाव ता. कामठी जि. नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन **१)** १० ब्रास रेती ६०,०००/— रूपये आणि **२)** टिप्पर क्र. एम. एच. ४९ बी. झेड. ९८९७ **किंमती ३५,००,००० /— रूपये असा एकुण ३५,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

वाहन चालक आरोपी नामे **कवडू घनश्याम मारबते, वय ४१ वर्षे, रा. वारेगाव ता. कामठी, जि. नागपूर** याच्या विरूध्द कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीतांवर कायदेशि कार्यवाही

# उमरेड उपविभागाअंतर्गत कुही अणि वेलतुर पोलीस यांची संयुक्तीक कारवाई

# २ लाख २३ हजार ९३० रूपयांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कुही :— दिनांक १२/०३/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड यांनी अवैध दारू वर कारवाई कामी कुही आणि वेलतुर पोलीसांचे संयुक्तीक पथक गठीत केले. श्रीमती वृष्टी जैन यांनी त्यांच्या पथकासह **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मौजा चंपा व वळद** येथे धाड टाकली असता आरोपी नामे १. **ज्ञानेश्वर उर्फ नानू लालचंद पवार व ३४ वर्ष राहणार चंपा आणि इतर ५ महीला आरोपी** याचे ताब्यातून **एकूण ३३ प्लास्टिक ड्रम मधील ५९७० लिटर मोहाफुल रसायन साडवा किमती २,०८,९५० /—रुपये ,मोहाफुल गावठी दारू १५ लिटर किमती ७५० /— रुपये , १४ टूबर कंपनीच्या बियर बॉटल किमती २७३०/— रुपये, असा एकूण २,१२,४३०/— रुपये तसेच प्लास्टिक ड्रम किमती ११,५००/— रुपये असा एकूण २,२३,९३०/— रुपयाचा माल जप्त करण्यात आला. ६ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर